**अपिलेट प्राधिकरण, पर्यावरण विभाग, महाराष्ट्र शासन**
**यांच्यासमोरील पुर्ननिरिक्षण अर्ज**

मे. गोदावरी बायोरिफायनरीज,
साखरवाडी, ता. कोपरगांव, वादी
जि. अहमदनगर

**विरुध्द**

महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ,
कल्पतरु पॉईट, ३ रा मजला, प्रतिवादी
सायन (पूर्व) मुंबई.

**महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने मे. गोदावरी बायोरिफारनरील या उद्योगास,जल प्रदूषण (प्रतिबंध व नियंत्रण) कायदा, १९७४ च्या कलम २५ व हवा प्रदूषण (प्रतिबंध व नियंत्रण) कायदा, १९८१ च्या कलम २१ नुसार केलेल्या उद्योग स्थापन करण्याच्या विनंतीला परवानगी नाकारण्याबाबत.**

**प्रस्ताव-**

महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाकडे मे. गोदावरी बायोरिफारनरीज या उद्योगाने जल प्रदूषण (प्रतिबंध व नियंत्रण) कायदा, १९७४ च्या कलम २५ व हवा प्रदूषण (प्रतिबंध व नियंत्रण) कायदा, १९८१ च्या कलम २१ अन्वये अनुमती मिळणेसाठी अर्ज केला होता. सदर कंपनी ही ना- विकास क्षेत्रामध्ये गोदावरील नदीपासून ६०० मिटर अंतरावर स्थापित असून कंपनीने डिस्टलरीची क्षमता ८० किलो लिटर, प्रतिदिन वरुन १५० किलो लिटर प्रतिदिन इतकी वाढविण्यासाठी विस्तरीकरणाला परवानगी मिळावी अशी विनंती केली आहे.पर्यावरण विभागाच्या नद्यांच्या पाणीगुणवत्तेमध्ये सुधारणा करण्याबाबतच्या दिनांक १३ जुलै,२००९ च्या धोरणानुसार गोदावरीचे क्षेत्र **"अ-१"** या संवर्गात येत असून नदी किना-यापासून ३ कि.मी.चे क्षेत्र ना-विकास क्षेत्र आहे. या शासन निर्णयापूर्वी, ना-विकास क्षेत्रात कार्यरत असलेल्या उद्योगांनी त्यांच्या प्रदूषणामध्ये घट होण्याच्या अटीवर विस्तारीकरणास मंजूरी देता येते. महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने कंपनीचा अर्ज फेटाळल्यावर अर्जदाराने आता अपिलेट प्राधिकरणाकडे अर्ज सादर करुन उद्योगाच्या विस्तारीकरणास परवानगी मिळावी अशी विनंती केली आहे. कंपनीच्या प्रस्तावावर अपिलेट प्राधिकरणापुढे दिनांक २७ डिसेंबर, २०११ व दिनांक ८/२/२०१२ रोजी चर्चा झालेली आहे. कंपनीने वसंतदादा साखर संस्थेकडून सादर केलेल्या दाखल्यावरुन विस्तारीकरणामुळे प्रदूषणात वाढ होणार आहे असे नमूद केले असल्यामुळे कंपनीचा प्रस्ताव अमान्य करण्यात आला होता.

तथापी, कंपनीने आता असे सांगितले की, पूर्ण विस्तारीकरणानंतरच नवीन तंत्रज्ञानामुळे प्रदूषणात वाढ होणे अपेक्षित नाही.सबब,कंपनीने कोणत्याही एका प्रथितयश संस्थेकडून (आय.आय.टी,यू.डी.सी.टी,निरी) विस्तारीकरणामुळे प्रदूषणात वाढ होत नसल्याच्या अनुषंगाने अहवाल तयार करुन घ्यावा आणि तो विहीत प्रपत्रात महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळास सादर करावा. अहवाल प्राप्त झाल्यानंतर महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने त्या अहवालाची तपासणी करुन त्यावरील आपल्या सविस्तर अभिप्रायासह प्रस्ताव अपिलेट प्राधिकरणास सादर करावा, असा निर्णय झाला.

| | | |
|---|---|---|
| अधिक्षक अभियंता | जल अभियंता | सचिव |
| महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, | बृहन्मुंबई,महानगरपालिका मुंबई | पर्यावरण विभाग, मंत्रालय, |
| सदस्य, अपिलेट प्राधिकरण | सदस्य, अपिलेट प्राधिकरण | अध्यक्ष,अपिलेट प्राधिकरण |